REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# मूलतत्ववादाची भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

**प्रा. इंदुमती शि. चोळके**
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,सोलापुर

**प्रस्तावना :—**



भारताची राज्यव्यवस्था आधुनिक व पश्चिमात्य असली तरी ज्या सामाजिक—आर्थिक—सांस्कृतिक चौकटीत ती क्रियान्वित आहे, ती जुनी, पारंपरिक आहे.भारतातील सर्व राजकीय संस्था आधुनिक भाषेत चालतात. तर प्राचीन समाजरचनेच्या सर्व संरचना पारंपारीक भाषेत सुरू असतात. या दोहोंमधील अंतर्विरोध तसेच आंतरक्रिया समजून घेतल्याखेरीज भारतीय लोकशाहीचे गुढ उकलू शकत नाही. भारताने संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्वाचे उद्धिष्ट समोर ठेवले. भारतीय राजकीय व्यवस्था आधुनिक प्रकारे काम करताना दिसते. परंतू भारतीय राजकीय व्यवस्था ज्या सामाजिक—आर्थिक सांस्कृतिक चौकटीत काम करते, ती परिस्थिती काहीशी मूलतत्ववादी असलेली दिसते, त्यामुळे प्रथम मूलतत्ववाद म्हणजे काय हे अभ्यासने योग्य ठरेल.

**मूलतत्ववादाचा अर्थ :—** एखाद्या तत्वज्ञानाची मूलभूत तत्वे प्रमाण मानून कालानूरूप त्यामध्ये होणारे बदल न स्वीकारणे त्यास मूलतत्ववाद असे म्हणतात.मूलतत्ववादी आपल्या तत्वांना त्रिकालबाधित सत्य व अपरिवर्तनीय मानतात. मूलतत्ववादाचा संबंध धर्माशी असल्याने आपल्या धर्माच्या अनुयायांनी काय करावे व काय करू नये यासाठी ते कठोर असतात. नैतिक — अनैतिकतेच्या संकल्पना ते धर्माशी निगडीत मानतात. ग्रंथप्रामाण्यास मानून धर्मग्रंथास सर्वश्रेष्ठ मानून त्यानूसारच आचरण झाले पाहिजे यासाठी त्याचा दुराग्रह असतो. मूलतत्ववादी व्यक्तीगत, सामाजिक, धार्मिक, राजकिय बाबतीत हस्तक्षेप करतात. राष्ट्रनिष्ठा दुय्यम मानून धर्माला सर्वश्रेष्ठ मानले जाते. आपल्या धर्मानुसार वागण्याचा आग्रह करून तसे वागावे यासाठी विचाराप्रसाराबरोबरच ते हिंसात्मक मार्गाचाही वापर करतात.

मूलतत्ववादी विचारामुळे भारतीय लोकशाहीपुढे पुढील आव्हाने निर्माण झालेली आहेत.

**१. जमातवाद :—** भारत हे धर्माधिष्ठित राष्ट्र नाही, येथे अनेक धर्माचे लोक राहतात. भारताने धर्मनिरपेक्ष तत्वज्ञानाचा स्वीकार केला आहे, परंतू धार्मिक मूलतत्ववाद, असहिष्णूता, संकुचितपणा यातून निर्माण झालेल्या संघर्षामुळे लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे. भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, जैन, बौद्ध इत्यादी धर्माचे लोक राहतात, परंतू या भिन्नधर्मीय लोकांत सहिष्णूतेची सहकार्याची भावना आढळत नाही. बहुसंख्येने असलेले हिंदू धर्मीय व मुस्लिम धर्मीय यांचा परस्परांना विरोध असलेला आपणास दिसतो. आपले हितसंबंध परस्परविरोधी आहेत असे मानून ते एकमेकांच्या विरूद्ध उभे राहतात, त्यामुळेच वेळोवेळी धार्मिक संघर्ष उफाळून येतात.

धर्माचा राजकारणासाठी वापर करून देतात त्यांना जमातवादी म्हणून ओळखले जाते. जमातवाद्यांना राष्ट्र किंवा राष्ट्रराज्य यापेक्षा धार्मिक समुदाय हाच राजकीय निष्ठांचा केंद्रबिंदू वाटतो. जमातवाद बहूसंख्यांकाचा असो की अल्पसंख्यांकांचा असो, राष्ट्रीय एकात्मतेला तो सारखाच घातक असतो. जमातवादी शक्ती धर्माचे राजकारण करीत असल्यातरी धर्म किंवा धर्मश्रद्धा जमातवादासाठी कारणीभूत

असतात. लोकांची खरीखुरी इहलौकीक गाऱ्हाणी न सुटल्यावर, अल्पसंख्यांकांना सांगायचे की धार्मिक पक्षपातामुळे ती सुटलेली नाहीत, आणि बहुसंख्यांकांना पटवून द्यायचे की अल्पसंख्यांकांचे अस्तित्वच ती न सुटण्यास कारणीभूत आहेत, असे जे खटाटोप अभिजन वर्ग करतो त्यातून जमातवाद निर्माण होतो. समाजात जमातवादी फाटाफूट आणि स्पर्धा—संघर्ष असणे सत्ताधारक वर्गाच्या नेहमीच पथ्यावर पडते.

निवडणूक भवितव्याची सतत विवंचना असलेले सगळेच राजकीय पक्ष लोकांच्या धार्मिक भावना चेतवितात आणि त्यांची मते मिळवून निवडून येतात, त्यांना राष्ट्रहितापेक्षा धर्महिताची ओढ लागलेली असते. सर्वच राजकीय पक्षाचे नेते आपण धर्मातीत राज्याचे पूरस्कर्ते आहोत असे भासवत असतात, परंतू त्यांची प्रत्यक्ष कृती मात्र धार्मिकतेची असते.

मतांची सौदेबाजी बिनदिक्कतपणे करता यावी म्हणून कोणताच पक्ष धर्मपिसाट पुढाऱ्यांना खडसावत नाहीत, उलट एखाद्या मतदारसंघात जो धर्मगट बहुसंख्येत असेल त्यानुसार तिथे बोलताना धार्मिक नेत्यांचा अनुनय करण्यासाठी प्रतिग्रामी स्वरूपाचे कायदे मंजूर करतात, त्यामुळे भारतीय लोकशाहीपुढील धार्मिकतेचा, जमातवादाचा अडथळा दूर होणे आवश्यक आहे.

**२. जातीयवाद :—** मूलतत्ववादी ग्रंथप्रामाण्य मानून स्थितीशील समाजव्यावस्थेचा पुरस्कार करतात. धर्मानुसार जाती व्यवस्था निर्माण केलेली दिसून येते. जातीव्यवस्थेचे समर्थन धर्माच्या आधारावर केले जाते. अमूक जातीने अमूक गोष्टी कराव्यात किंवा करू नये अशी विचारधारा मूलतत्ववादी मानतात. प्रत्येक धर्मात जाती, उपजाती, पंथ दिसून येतात. प्रत्येक जात ही दुसऱ्या जातीहून वैशिष्टयपूर्णरित्या वेगळी असते. आचार, विचार, राहणीमान, रोटी—बेटी व्यवहार, सांस्कृतिक व धार्मिक कार्ये इत्यादी बाबत प्रत्येक जात वैशिष्टयपूर्ण असते. एकाच जातीचे लोक ऐक्याच्या भावनेने आपल्या जातीचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे कार्य करीत असतात, त्यामुळे त्यांना दुसऱ्या जातीविषयी हेवा, मत्सर, द्वेष वाटत राहतो. आपलीच ' जात श्रेष्ठ' हा मूलतत्ववादी विचार प्रत्येक जातीत आढळतो, त्यामुळे समता, बंधुभाव या गोष्टीचा लोप होतो. लोकशाहीसाठी समता, बंधुभाव याबरोबरच सहिष्णूता आवश्यक आहे.

जातीसंस्था पारंपारिकतेवर आधारित महाजनसत्ताक संस्था असून आधुनिक परिस्थिती व लोकशाही आदर्श यांच्याशी ती विसंगत आहेत असे नेहरूंनी म्हटले आहे. भारतात कोणत्याही जातीचा राजकीय पक्ष निर्माण झालेला नाही, परंतू विशिष्ट जातीचे हित साधणारे पक्ष दिसून येतात. काही राजकीय पक्षात विशिष्ट जातीच्या लोकांचा अधिक भरणा असलेला दिसतो. तसेच भारतातील सर्वच राजकीय पक्ष निवडणूकांत अधिक मते मिळविण्यासाठी विशिष्ट जाती— जमातीशी संगनमत करताना दिसतात. निवडणूकीच्यावेळी उमेद्‌वार जातीयतेचा आधार घेतात. हेच प्रतिनिधी जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा त्यांच्या कार्यात विशिष्ट जातीच्या हिताचाच अधिक विचार झालेला असतो. जातीयतेचे राजकारण राष्ट्रीय ऐक्याला व लोकशाहीच्या संवर्धनाला घातक आहे. राजकीय पक्ष मतांच्या स्वार्थापोटी, जातीयतेला खतपाणी घालून भारतीय लोकशाहीपूढे एक आव्हान निर्माण करत आहेत.

**३. असहिष्णूता :—** लोकशाहीमध्ये विचार स्वातंत्र्याला महत्व असते. लोकशाहीच्या कारभाराची चर्चा विचार विनिमयातून केली जातो, त्यामध्ये विरोधी मतांचाही विचार करून त्याचा आदर केला जातो. विरोधीमते मांडणाऱ्या बद्‌दल सहिष्णू वृत्ती असावी लागते, पण मूलतत्ववादी विरोधी मतांचा आदर तर सोडाच पण ती मांडूसुद्धा नयेत यासाठी प्रयत्नशील असतात. जी मते आपल्याला गैरसोयीची आहेत, आपल्या मतांविरूद्ध आहेत, ती मते चारचौघात कोणी उच्चारतासुद्धा कामा नयेत हा अट्टहास लोकशाहीने सर्वांना दिलेल्या विचारस्वातंत्र्याची पायमल्ली करणारा आहे. ही असहिष्णूता झाली आणि ती कोणत्याही प्रकारच्या लोकशाहीत मान्य नसते. आपल्या मताविरूद्ध मत मांडणाऱ्यांला जगण्याचेही स्वातंत्र्या नाही हेच तत्व डॉ. दाभोळकरांच्या हत्येतून मूलतत्ववाद्यांनी प्रस्थापित केले आहे. हिंसा करून, दहशत माजवून विरोधीमते दाबण्याचे प्रयत्न वाढीस लागले आहेत. मतमतांतरांचे अस्तित्व हाच तर लोकशाहीचा आत्मा आहे, त्यामुळे आपल्याच मताचा प्रसार झाला पाहीजे असा मुजोरपणा करणाऱ्यांची संख्या वाढीला लागणे म्हणजे लोकशाही मूलतत्वांची हत्या होणे होय, म्हणून डॉ. दाभोळकर म्हणतात, त्याप्रमाणे 'समाजाची धारणा विवेकवादावर असावी, लोकशाहीत प्रश्न विचारणे आणि विचार—कार्यक्रमाची चिकित्सा करणे यांची

भूक असावी, धर्म हा महत्वाचा विचार असला तरी त्याचे अंधपणाने पालन न करता डोळस व विचारी धर्मचिकित्सा व्हावी’.

**४. अविवेकीपणा :—** मूलतत्ववादी धर्माला प्रमाण मानून व्यक्तीगत जीवनातील गोष्टींनाही धर्माशी निगडीत करतात. धार्मिक अंधश्रद्धा, देवधर्म, परलोकाचे व पूर्नजन्माचे आकर्षण व ईश्वराची भीती अशा अनेक गोष्टीतून गरीब, श्रमिक, व सामान्या जनता अगतिक बनते. आपली असणारी स्थिती, होणारा अन्याय, जुलूम यास ईश्वरी कोप मानले जाते. वास्तविक ईश्वरी कोप वगैरे काहीही नसून आपलेच अकर्तृत्व त्यास जबाबदार असते, म्हणून वास्तविक परिस्थितीची जाणीव होण्यासाठी वैज्ञानिक व सुधारणावादी वृत्ती अंगीकारली पाहिजे. स्त्रीयांचा विकास होण्यासाठी त्यांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे, पण मूलतत्ववादी ‘मलालावर जीवघेणा हल्ला’ करून स्त्रीयांना शिक्षणच नाकारण्याचा अविवेकीपणा जगासमोर आणतात. भारतीय संविधानात कलम ५१ अ मध्ये भारतीय नागरीकांची मूलभूत कर्तव्ये उद्धृत केलेली आहेत, त्यामध्ये वैज्ञानिक मानस तयार करणे, चिकित्सा करणे, सुधारणा करणे, मानवता वृद्धिंगत करणे यांचा उल्लेख आहे, परंतू मूलतत्ववाद्यांना यांचाच विसर पडला आहे.

विवेकवादी — विज्ञानवादी विचार फक्त एका समुदायासाठी नसतात, ते मानवी जीवन सुसाह्य होण्यासाठी सर्व समाजांसाठी आवश्यक आहेत. धर्म ही केवळ तपासण्याची बाब नसून यातील कालबाह्य, अयोग्य, अनिष्ट व अन्यायकारक गोष्टी आहेत त्या नाकारायला पाहिजेत, हा विचार आत्मसात केला पाहिजे. हमीद दलवाई म्हणतात त्याप्रमाणे धर्मातील कालबाह्य व अन्यायकारक तरतुदी काढल्या पाहीजेत. मुस्लिम महिलांवरील अन्याय दूर झाला पाहिजे, मग त्याबद्दल त्या धर्मात काय आहे—नाही हे पाहण्याची गरज नाही. हमीद दलवाई यांनी सांगितलेला विवेकपणा भारतीय लोकशाहीसाठी आवश्यक आहे, पण आपले राजकीय पक्ष व नेते हा विवेकीपणा अपवादानेच दाखवताना दिसतात.

समारोप

भारतीय लोकशाहीपुढे मूलतत्ववादाने आव्हान उभे केले आहे, त्यामुळे धर्मनिरपेक्षता म्हणजे निव्वळ ‘सर्व धर्म समभाव’ अथवा राजकारण व धर्माशी फारकत व अल्पसंख्यांकांची खुशामत आणि बहुसंख्य हिंदूवरील अन्याय असे नाही. धर्मनिरपेक्षता म्हणजे प्रत्येक व्यक्ती व धर्म, व्यक्ती व धर्म, व्यक्ती व राज्यसंख्या, व्यक्ती व समुदाय आणि भिन्न धर्मिय समुदाय यांचे आपापसात नाते काय याचा विचार होय. धर्मनिरपेक्षतेची दिशा ही धर्माच्या उच्छेदाची नसून, धर्माच्या विवेकीभवनाची आहे. त्यासाठी ईश्वरकेंद्रीत धर्म मानवकेंद्री केला जावा व परलोकवादी धर्म इहलोकवादी केला जावा, त्यातूनच विवेकवादी समाज निर्माण होवून भारतीय लोकशाही समृद्ध होईल.

## संदर्भ

१) पानसरे मेघा, २०१८,‘धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि समाजवाद’, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
२) जोसेफ जोजी,२०२३,‘लोकशाहीचे वास्तव’, मधुश्री पब्लिकेशन, पुणे ,The Silent Coup चे मराठी भाषांतर,पूनम छत्रे
३) बाळ प्रकाश व बेडकीहाळ किशोर,२००३,‘धर्म आणि राजकारण- विपर्यास आणि वस्तुस्थिती’, अक्षर प्रकाशन,सातारा
४) चौधरी देवाशिष रॉय व किंग जॉन, २०२३, ‘लोकशाहीच्या हत्येसाठी’ अनु.बा.उत्पल व., मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे
५) कांबळे बाळ, (संपा.(,२०१२, ‘भारतीय लोकशाही समोरील आव्हाने’, डायमंड पब्लिकेशन, पुणे
६) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास संपा.,२०१०,‘भारतीय लोकशाहीअर्थ आणि व्यवहार -’, डायमंड पब्लिकेशन, पुणे